
पुरुषोत्तम शिवराम रेगे

१९४३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १४५५



REFBK-0006421
REFBK-0006421

# हिमसेक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६३४५ वि: काव्य
क्रमांक १४५५५ नों: दि: २३/३/६०

REFBK-0006421
REFBK-0006421

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रा. क्र. ६४२१

पुरुषोत्तम शिवराम रेगे

# हिमसेक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 24375 वि. 31(4)
क्रमांक 9154 नों. दि. 23.3.40

१९४३

मुंबई : शबरी साहित्य

हिमसेक: प्रथमावृत्ति, दसरा १८६५
प्रकाशिका: सौ. **सरिता पुरुषोत्तम रेगे**, बी. ए.,
'शबरी साहित्य,' १४ हार्वे रोड, मुंबई ७

सर्व अधिकार प्रकाशिकेचे स्वाधीन

वेढाळ्यावरील रेखन लेखकाच्या
कल्पनेप्रमाणे तयार
करून घेतलें.

मूल्य

**दीड रुपया**

मुद्रक: **रामचंद्र काशीनाथ तटणीस**, श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४, ठाकुरद्वार, मुंबई २.

# अनुक्रमणिका


| | पान |
|---|---|
| हिमसेक ... ... ... | तीन |
| उर्वशी ... ... ... | चार |
| परवाना ... ... ... | नऊ |
| प्रीत ... ... ... | दहा |
| पाणोठ्यापाशीं ... ... ... | अकरा |
| लिलीचीं फुलें ... ... ... | बारा |
| देशांतरीच्या गोष्टी सांगतां ... ... | तेरा |
| निःशब्द वादळ ... ... ... | चौदा |
| प्रतीति ... ... ... | पंधरा |
| मीलन ... ... ... | सोळा |
| लीलारति ... ... ... | अठरा |
| अबोला ... ... ... | तेवीस |
| शेवगा ... ... ... | चोवीस |
| काजळी जमीन ... ... ... | पंचवीस |
| वर्षागान ... ... ... | सव्वीस |
| कलावती .. ... ... | बत्तीस |

## पुरुषोत्तम शिवराम रेगे

जन्म : २ ऑगस्ट १९१०

काव्यपुस्तकें :

**साधना आणि इतर कविता** ( १९३१ ): चार आणे

**फुलोरा** ( १९३७ ): बारा आणे

**हिमसेक** ( १९४३ ): दीड रुपया

आगामी :

**पहिली भेट** ( प्रेमगीतें )

**प्रतिष्ठान** ( काव्य )

**डॉ० उद्धव शिराळी आणि त्याचें जग** ( कथा )

एकंदर कविता सोळा आणि त्या सर्व मुक्तछंदांत आहेत.

मुक्तछंदांत पांच आणि सहा अक्षरांचे सरमिसळ चरण असतात. वाचतांना ओवी किंवा अभंग या छंदाप्रमाणें—ऱ्हस्व आणि दीर्घ—साऱ्या अक्षरांवर भार देऊन वाचायचें. प्रत्येक चरणाच्या पहिल्या अक्षरावर थोडा अधिक भार द्यायचा, आणि चरणाच्या शेवटीं थोडा विराम घ्यायचा. मुक्तछंदाविषयीं अधिक माहितीसाठी रा. आत्माराम रावजी देशपांडे यांच्या 'भग्न-मूर्ति' या काव्यपुस्तकाचीं परिशिष्टें पहावीं.

रचनाकाळ १९३३–४३

१४ सप्टेंबर १९४३,
'बिल्व–कुंज',
१४ हार्वे रोड, मुंबई ७

**पुरुषोत्तम शिवराम रेगे**

सरिता

आणि

उदयन

यांच्यासाठी

अनुक्रम २६३४६ वि.
क्रमांक १४५५ नों: दि:

सतेज तुझें बोलणें चालणें.
सुकुमार खेळे अंगीं नव्हाळी.
क्षणभर वाटे
अपूर्व जणू हिमसेक हा
स्वच्छ, निरागस, तेजाळ, विश्रब्ध.

६४२९

# उर्वशी

काळोख चेंगट;
चोहींकडे हें हैराण वादळ;
पुरूरवा आणि उर्वशी एकांतीं—
साधिली वेळा खाशी गंधर्वांनी !
पळविले मेंढे प्रिय उर्वशीचे.
'धावा रे, पकडा' एकच हुल्लड.
प्रमत्त धावतो स्वतः पुरूरवा.
पडे, गडबडे, कोण कोलाहल !
त्यांतच मोठा गडगडाट,
चमके वीज;
झालें राजाचें विवस्त्रदर्शन शय्येबाहेर !
होतांच ऐसा संकेतभंग,
त्यजून राजातें
उर्वशी निघे जाण्या माघारी.
आवेश, रोष, असहायता,
अमोल क्षणांचीं चपखल शल्यें,
चार वर्षांच्या सहजीवनांतील अतृप्तता—

काहूर एकच दाटून येई.
‘ उर्वशी, उर्वशी, ’
आर्त हाकारित
धावतो दीन राजा पुरूरवा.

हृदयीं विप्लव.

‘ उर्वशी, उर्वशी,
फीर माघारी. ’
‘दुष्प्राप्य आता वायुपरी मी.
नको रे, येऊस जाई माघारी ! ’
तरीहि पुन्हा
‘उर्वशी, उर्वशी, ’
आर्त हाक अशी.
त्याच हाकेच्या अक्षरांतून
एकेक स्फुरती
प्रियसखीचे गुणविशेष.
विलोल तें लास्य, मादक आव्हान,
लावण्य अम्लान
—हटवाद ऐसा ज्वलन्त अंगीं

नटवू शके जो स्त्रीच एकली !—
युगानुयुगीची विलोभनशक्ति
एकवटून उधळिली जणू
तपोनिधि श्रीनारायणाने.
आणि वाटतें
मीलन ठरलें अपुरें केवळ
स्वप्नरंजन.

‘उर्वशी, उर्वशी,’
हाक पुन्हा अशी.
दस्युवधार्थ सामर्थ्य तुझें
देवांनी वर्धिलें, दिधलें नद्यांनी
पयोदान तुला.
पराक्रमाची तुझ्या परिसीमा
साऱ्यांनी पहावी म्हणूनच ना ?

‘उर्वशी, उर्वशी,’
हाक उगा अशी.
रतिकुशला मनोज्ञ तशीच
जाणते ही खरें वीरहृदय.

म्हणते जरी,
'स्त्रियांचें सख्य नव्हेच तें सख्य—
वृकहृदया त्या,
तशांत कामना परिपूर्ण माझ्या—
जातें माघारी.'
लावू नको हे बोल मनाला.
नव्हे हें वैराग्य किंवा नैर्घृण्य—
केवळ बहाणा.
युगानुयुगींचीं स्वप्नबीजें रे,
हिच्यांत आहेत सामावलेली
चाळविते ही म्हणून ऐसी.
निर्माणशक्ति ही;
भुले जेथे जेथे निर्माणक्षमता.
अनित्य जें तेथे सनातन ही.
युगकर्ता तूही;
आहेच तुझें बीज तिच्या पोटीं
ज्यांतून पुढे घेणार जन्म
मनस्वी आयु.
अरे, जोवर होतास सुकृती
तोवर तुला वश उर्वशी.

'उर्वशी, उर्वशी,'
कशाला व्यर्थ आक्रंदितोसी ?
कर्मकुशल योगी जर तू
मांडिजे यज्ञ सत्वर आता
सत्त्वरक्षणीं.
तुझ्याच पाशीं
उर्वशी, उर्वशी.

ही उर्वशी ऋग्वेदांतील तेजस्विनी; कालिदासाची शापबद्धा अगतिका नव्हे.

# परवाना

विंधून गेली
एकदांच तुझी मदिर नजर.
कळलें नाहीं
कोणता गूढार्थ होता भरला...

आणि खरोखर
नव्हताच जरी अर्थ तिजला
मग ही अशी
कटाक्ष–जादू उगा उधळण्या
सांग हे अदये,
परवाना कोणी दिला तुजला ?

# प्रीत

भग्न-मनाला भांबावित अशी
कोमलता कां उगा उमलते ?
ठाऊक नाही का ?
मुजोर प्रीतीचा हिमार्त वारा
जाळून गेला मनाचा मोहोर...!

## पाणोठ्यापाशीं

पाणोठ्यापाशीं खट्याळ मुली गे,
हितवाद तुझा खोटा ऐकला.
त्या वेळीं, कधीहि
नाही जें पटलें मनोमनाला,
होतील त्याच्याच कितीक कहाण्या.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५४२१
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# लिलीचीं फुलें

लिलीचीं फुलें
तिने एकदा
चुंबितां, डोळां
पाणी मी पाहिलें...!

लिलीचीं फुलें
आता कधीहि
पाहतां, डोळां
पाणी हें सांकळें... !

# देशांतरीच्या गोष्टी सांगतां

देशांतरीच्या गोष्टी सांगतां
मधेंच त्याचे शब्द भारावले.
आठवलें काही--
अथांग डोळे....ज्यांत बुडाले
सात समुद्र, अनंत अंबरें.

# निःशब्द वादळ

नदी किनारीं
वारा भरारा.
चंचल अंचल.
सांवळी चाहूल.
उरीं थरारे
नवी नव्हाळी.
जुळलीं, भुललीं
हृदयें दोन...!

नदी किनारीं
वारा भरारा.
गवती पातीं
लपती कांठीं.
तरंग सारंग
पाण्यावरतीं.
उसळे, कोसळे
निःशब्द वादळ....!

# प्रतीति

उच्छृंखळ कुण्या हृदयाची खूण
एकदा कुण्या हृदया पटली
आणिक सहज
अबोल जात्या ओठांमधून
स्फुरलें गीत, स्फुरलें जीवित.

# मीलन

वर लाल निळी तेजाळ सृष्टि;
इथें पसरली
हिरवी पिवळी खुलास सृष्टि;
झुळ्झुळ ओहळ;
दुरून येई कुठून तरी अस्फुट गान.

क्षणांत कधी
आकाश–धरेचे रंग बदलती.
मळे लाल निळे;
क्षितिज खुले हिरवें पिवळें;
ओहळ जवळ,
दूर दूर परि कुठून तरी त्याची झुळ्झुळ;
गान दूरचें
हांसतें, नाचतें हृदयांतच.

कोणीकडे तू, कोणीकडे मीहि.
उसळले परी
रंग तरंग कधी काळीं जे
खेळ हा त्यांचा जलांत, गानीं,
आकाशीं आणिक धरणीवरी.

# लीलारति

विवाहपूर्व ओळख पहिली ओझरतीच
आणि नंतर सहवास तोहि तीन दिसांचा.
क्षण एकेक होता तेव्हाचा
किती मोलाचा लीलारतीचा !
नंतर गेलीस दूर माहेरीं
पहिल्या सुखाची भूल देऊन,
अतृप्त, अधीर हृदयाची या
भूक वाढवून.

आणिक एकेक पुढील भेटीचे दिन मोजतां
सुखचित्रें तीं अक्षय्य पहिलीं
हृदयपटावर स्फुरती, फेर धरिती--
पांढरी शुभ्र कबूतरें जणू
घुमती झुमती.

डोळे मासोळे,
ओठ कोवळे गुलाब-कळे,

नाक रेखीव, गाल मख्मली,
हनु लहान—
गोजिरी साजिरी दिसते मूर्ति.
आणि नंतर
एकेक पट विरल सरतां
रेषा-संगति सूचक बाह्य
कुशल जणू कलावंताच्या स्पर्शाने घेई
मनोज्ञ रूप.
हृदय थबके...मधेंच चुकला एक जो ठोका
गडबडींत का उसळून तो वरती येई ?
तांबुस गहिरे इवलेसे स्तन;
वरती दोन काबुली द्राक्षें
—काबुली मेवा चुंबचुंबावा !
ओटीपोटीच्या लहरी लाटा
नाभिमंडळीं भुलीं भुलल्या
—निघाल्या होत्या
जीवन-संगीत दऱ्याखोऱ्यांत
उधळायाला.
तरीहि त्यानी केली किमया.

अदम्य संगीत कण कण हें आणिक द्रवलें.
विश्व सारें त्यांत न्हाऊन फुललें...

गवती शय्या माळावरती;
संध्याकाळच्या धूसर छाया;
आणिक आपण एकमेकांच्या बाहूपाशांत.
आकाश-रंग चित्रविचित्र किती यथार्थ
मीलनपूर्व मनोभावनांचें
करिती चित्रण !
—तशीच लोटली कितीक युगें;
आठव त्यांचा कधी कुणी केला ?—
भुईतून येती अस्फुट रव;
युगांतरींचीं रहस्यें जणू कानांत सांगे
सखी धरित्री—
प्रेमाचें ममत्व, प्रेमाचा त्याग,
प्रेमाचीं दुःखें, प्रेमाचीं सुखें,
प्रेमिकांची चिरंतन कहाणी.
आणिक मग अंधार थोडा अधिक पडतां
किती सुखद भासली ऊब

एकमेकांची !
आकाशीं आता एकच रंग शांत धूसर,
नाही खळबळ अतृप्तता वा—
मीलनोत्तर जशी येतसे गाढ विश्रब्धता.
गवतांतून कीटक मुंग्या
आपुलीं कामें करीत फिरती;
अस्पष्ट त्यांची हालचालहि
किती ही आता स्पष्ट ऐकू ये !
—आणखी लोटली कितीक युगें;
आठव त्यांचा कधी कुणी केला ?—
मग हलकेंच अर्ध्या मिटलेल्या नयनांनी तू
म्हटलेंस, ‘ राहूं असेच...इथेच ’
अधिक घट्ट आवळून बाहू...

५४२१

आळवून गेला पहाट—वारा
कधीच केव्हाचा.
सूर्यहि आला जवळ जवळ माथ्यावरतीं.
तरीहि नाही उडाली भूल
डोळ्यांवरची.

अदम्य संगीत कण कण हें आणिक द्रवलें.
विश्व सारें त्यांत न्हाऊन फुललें...

गवती शय्या माळावरती;
संध्याकाळच्या धूसर छाया;
आणिक आपण एकमेकांच्या बाहूपाशांत.
आकाश-रंग चित्रविचित्र किती यथार्थ
मीलनपूर्व मनोभावनांचें
करिती चित्रण !
—तशीच लोटली कितीक युगें;
आठव त्यांचा कधी कुणी केला ?—
भुईंतून येती अस्फुट रव;
युगांतरींचीं रहस्यें जणू कानांत सांगे
सखी धरित्री—
प्रेमाचें ममत्व, प्रेमाचा त्याग,
प्रेमाचीं दुःखें, प्रेमाचीं सुखें,
प्रेमिकांची चिरंतन कहाणी.
आणिक मग अंधार थोडा अधिक पडतां
किती सुखद भासली ऊब

एकमेकांची !
आकाशीं आता एकच रंग शांत धूसर,
नाही खळबळ अतृप्तता वा—
मीलनोत्तर जशी येतसे गाढ विश्रब्धता.
गवतांतून कीटक मुंग्या
आपुलीं कामें करीत फिरती;
अस्पष्ट त्यांची हालचालहि
किती ही आता स्पष्ट ऐकू ये !
—आणखी लोटली कितीक युगें;
आठव त्यांचा कधी कुणी केला ?—
मग हलकेंच अर्ध्या मिटलेल्या नयनांनी तू
म्हटलेंस, ‘ राहूं असेच...इथेच ’
अधिक घट्ट आवळून बाहू...

५४२१

आळवून गेला पहाट-वारा
कधीच केव्हाचा.
सूर्यंहि आला जवळ जवळ माथ्यावरतीं.
तरीहि नाही उडाली भूल
डोळ्यांवरची.

वेल्हाळ सृष्टि रेंगाळतेच—
चिबुक-चुंबक इवलासा तीळ,
काबुली द्राक्षें टपोरलेलीं,
कमरेवरच्या पांढुरक्या रेषा,
गंध मधुर पहाडी मधाचा—
आणि मग तूहि खेळांत सामील होऊन दाविसी
मलाहि माझ्या गळ्याभोंवतालीं
तिळांची माळा,
पाठीवरचा भुऱ्या रंगाचा एकलाच केस,
डाव्या मांडीवर जखम कधीची लहानपणीची,
‘ मादक वास, ’ म्हणसी, ‘ आंगाला
मेंदीच्या जणू फुलांसारखा....’

अशीं एकेक पुढील भेटीचे दिन मोजतां
सुखचित्रें तीं अक्षय्य पहिलीं
हृदयपटावर स्फुरती, फेर धरिती—
पांढरी शुभ्र कबूतरें जणू
घुमती, झुमती.

# अबोला

स्फुंदून झाले नाक डोळे लाल.
निर्धार 'नाहीच बोलणार आता'
परंतु पुन्हा
दिसतांच कांत...अजाण अबोला
निमिषमात्रच नयनीं फसला.

## शेवगा

दोन प्रहर. निवांत सारें.
श्रमभराने बाजेवरतीं
पांगुळलेली तू.
खिडकीबाहेर ढाळितो चवरी
आसुसलेला शेवगा दारचा.

# काजळी जमीन

काजळी जमीन किती ही सकस !
पाभर फिरली, खपे हलधर.
गर्जत गर्दींत जलधर ये.
अंकुरे जीवन...
नंदनवन !

भोळी आशा आता
मागते, जागते—
'मोतीं हीं हातीं येतील तोचि
दिन भाग्याचा.'

हलधर दीन आर्जवितो हा.
जलधर ये गर्जत गर्दींत.

# वर्षागान

आणि कधी तरी
तुंबळ वायूच्या अट्टाहासांत
परिचित श्री चिरपरिचित
रूप दाविते...

वर्षारंभीच्या संध्यासमयीं
होतास एकदा
डोंगरमाथ्यावर एकला
पहुडलेला तू ;
पिसाट आकाशीं मेघसागर;
वादळीं नौका मनश्चंद्रिकाच
जणू एकाकी;
आणि एकीकडे
सोरेंकाराचें नक्षत्र लोभस...

कितीकदा तू आहेस म्हटलें
'अन्यथावृत्ति' चित्त तुझेंहि वर्षाप्रसंगीं.

वर्षतां मेघ पुलकित होती
तनु-मनोवृत्ती,
जुनाट मुळें खोल शिरती,
चिर-नूतन सत्त्वप्रचीति
आकिसलय स्फुरवी द्रुम.
अशीच काहीशी तुझी असावी
अस्फुट अवस्था.
अमित युगांचें जडत्व तुझ्या देहांत भिनतें;
रोम रोम तुझे मुळें धरिती;
विशाल विटप होऊनि राहसी—
अंतरीं अम्लान जीवन—योग
चाले अविरत.
अश्वत्थ जणू ऊर्ध्वमूल आणि अधःशाख तू
विश्वसाधर्म्य शिकविणारा.

प्रत्यक्षमुक्ति इच्छितां ऐसीं
चिरबंधनें तुज लाभती...

आणि एकाकी कोसळे वादळ.

ओघळले सर.
न्हाणुली धरा न्हाऊन फुलली,
खळखळ पाणी चोहोबाजूला.
तसाच परि तू पहुडलेला.
वस्त्रेंहि तुझीं चिंब झालेली.
आसरा उगाच इथें थोडासा
कलत्या कडयाचा...
जडत्व भिनलें जरी देहांत
संदीपन आंत दिव्य शक्तीचें
संचार तुझा सलील दूर.
स्थलकालाच्या सापेक्षतेचें
नुरे बंधन.
मनुज-जीवनीं स्थित्यंतरें जीं आजवेरी झाली,
चालली आहेत,
पुढील तशीच अंधुक आंखणी—
आविष्कार त्यांचा स्वप्नविचित्र
तुझ्याच जीवनीं दिसून येई.

तुझें तें पहिलें रांगडें स्वरूप;
लहरी निसर्गासवे झुंजतांना

स्वार्थांध, कल्पक मानुष–वृत्ति;
पापपुण्याचें बुजगावणें
—समाजधारणेंसाठीं जें मुळांत—
नैतिक–जीवन आदर्श याची
थोडीशी जाणीव;
आणि क्वचित नवधर्माची नवसंहिता
खरोखर जिचे आजसारख्याहि
भीषण रौरवीं पाठ आशादायी.

कोठून परंतु जीवनीं आशा !
सर्वभक्षक संहारशक्तीने
प्रलयकालच दाविला जेथे,
परस्परांचा निःपात कराया
मांडिलें जेथे अशेष–युद्ध—
नवीन तंत्र जाळपोळ आणि
लूटमारीचें,
मानव जेथे मानव–रिपु,
मानव्याचीच चालली होळी.

होय, परंतु
वर्षाकाळचें जलसिंचन
अनादिकालापासून हीच
मानवी आशेची सत्य भूमिका,
प्रतिज्ञापूर्ति,
वरुणदेवाची ऋतस्थापना.
जाणीव ही होतां युगानुयुगीचे,
अदम्य आशेचे,
ओळखीचे सूर घुमू लागती.
ठायी ठायी जे पडसाद त्यांचे
तेच तुझें मग संगीत–साधन,
संहिता–पठण.
कारण याच जाणीवेंतून
येणार आहे पुढील सृष्टि...

तडकते वर जलकणांची संतत धारा;
स्वेदकण हे फुटून येती आंतून वर...
क्वचित एकादा फेनधवल
हंसाकृति मेघ घालतो भासे
झेप खालती—**ज्युपिटर** जसा—

उष्ण--मृदुल पिसांच्या गर्दींत
विकल **लेडा.**
दूर कुठे तरी साद उठती तार उत्कट,
‘ होईन पांखरूं, घेईन चोचीने
कमल--तंतू , देठ कोवळे;
तुडुंब तडागीं डुंबत नाचेन—
पंख माझेच जीवनोत्सवीं आहेत ध्वज...! ’
जडत्व आता इतुकें भिनलें
तू सहसंवादी चराचराचा.
उरल्या नाहीत काहीच सीमा....
वहाळ, नाले...पाणीच पाणी...
अचल परी मनूसाठीं तू मत्स्य सत्यसंघ
कारण आहे जीवनीं तुला उत्कट आशा.

असें कधी तरी
तुंबळ वायूच्या अट्टाहासांत
परिचित श्री चिरपरिचित
रूप दावितें...

---

ओळ १३ : सोरेकाराचें नक्षत्र=शुक्र तारा. ( सोरेकार=सुराकर )

ओळ ६४ : अशेष-युद्ध= Total War.

ओळी ८७–८९ : ज्युपिटरने हंसरूपाने येऊन लेडा उपभोगिली अशी एक ग्रीक लोककथा आहे.

# कलावती

उचंबळून उल्लसित भावें
अंतरें न्हाणिते, फुलवी रोमांच;
दावून कितीक प्रसाद–चिन्हें सुखद–रूप
करी सुखरूप जीवन–यात्रा
—सिद्ध कल्पनेची स्वैर भरारी
स्फुट, मनोहारी.
मानवी जीवन सार्थकता पावे
इथेच गमे.
किंबहुना इथे दिसून येई
विश्व-संसाराचें प्रकट रूप
अधिकारवाणि येतां मुहूर्ता...

आनंद--निस्यंद
वर्षतां स्पंदन चाले जीवाचें...
ल्हानशाच परि गूढ स्मृती
खरोखरीचा खेळ खेळती.

लोकरी धुकें...दिशा हांसती...त्यांत या भासती
अर्ध्या मिटलेल्या कळ्याच जणू
जाईजुईच्या...

जीवाच्या ओढी, स्मृती, आकांक्षा
यांचेंच आहे ना भावुक जीवन ?
त्याच जरा कुठे विसांवा मिळतां
मनींचे संकल्प फुलवितात
कुशल स्पर्शीं.
बहरून येई लहरी सृष्टि;
मन हेलकावे, जरा घुटमळे—
माहेरवासीण...
हिरवा बगीचा; सोनेरी लहरी फुलांची माया—
जीवन; स्वप्नें...!

जीवन; स्वप्नें...
जगीं पाहतां हीच प्रणाली.
रोजची भाकरी; श्रमाची चाकरी;
प्रेमळ जीवांची शीतळ साउली;
सुखाचे शब्द दोनच जरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २५३४५ वि. काव्य

—आणिक कधी कटु बोलणीं;
मित्रांची माया; एकादें गीत;
संध्याकाळीं किंवा परतून येतां
गळां झेपावती चिमूकले पांख घरपांखरांचे;
दुखणींबाहणीं; शोकद प्रसंग;
वियोगाची आंच; हिरमुशी मन—
आनंदाचें वाण, दुःखाचें भाजन
असेंच जणू आमुचें जीवन.

जीवनाची आहे अशी ही घडण
—साक्ष मनोमन—स्वस्थता नसे.
अनुभविलेल्या किंवा अज्ञात
संवेदनांच्या परिपूर्तीसाठी
चाले धडपड...तींच हीं स्वप्नें !
पहा जरासें—
अंतर्गत आणि अमूर्त मापें
नादलयांचें आव्हान घेऊन
साक्षात्कारें मग कधी मांडिला
संगीत–विलास,
साध्याच वस्तूचें किंवा दावून चमत्कृति–रूप

आंतील तत्त्व गांठून देणें;
रेखा–मंडनाची मोहक युति;
किंवा कोरिली तिलोत्तमा मूर्ति
सौंदर्य-सोपान;
शब्दब्रह्मातें प्रसवी किंवा
वागीश जेव्हा कल्पना--राणा
—म्हणती, ‘ ऋषीणां पुनराद्यानां
वाचमर्थोऽनुधावति ’ ऐसें.

संगीत, कला, साहित्य किंवा
मानवी विकास जेथे जेथे दिसे
तेथे पाहतां एकच गूढ लपलें दिसे—
निसर्गाशीं आहे झुंज हें सारें.
मानव आपुल्या कल्पना--जाळें
निसर्गजात वेढून बळें
उभवी आपुली प्रतिसृष्टीच
—विश्वामित्र हा...

अगदी पूर्वीं रानटी स्थितींत
जेव्हा गुहांत वसतीसाठी

राहती मानव टोळ्याटोळ्यांनी--
कठीण जीवन; पदोपदीं भीति
हिंस्र पशूंची, दुसऱ्या टोळ्यांची
उपाशी पोटाची—
तेव्हाहि त्याच्या मनोमनांत
उत्सुक आशेची भावडी मोहिनी
भीतीलाहि कधी क्षण भुलवी.
साक्ष पहा त्याची स्पेनच्या गुहांत
जेथे अजूनहि काढलेलीं त्यांनी
चित्रें दिसती.
लपली होती गुहेंत अंधारीं
हजारो वर्षें...परि आज घेती
नवजीवन.
मानव ते होते कलेचे पाईक,
मानवजातीचे पहिले सैनिक,
ज्यांनी आपल्या दुर्दम शक्तीने
बंडाचें निशाण पहिलें रोविलें.
त्यानंतर झाली किती स्थित्यंतरें
इतिहासांत.
जीवनपथ

थोडा सुकर जरि पुढे झाला
मानवी सत्ता पृथ्वीवर होतां
सिद्ध, प्रस्थापित.
परि मूळचे प्रश्न तसेंच.
दिशा बदलल्या, नवीन वळणें,
आजूबाजूचा प्रदेश निराळा,
प्रवासहि थोडा सुखसोईंचा
परि उद्दिष्ट, मनाच्या ओढी,
सारें काही तेंच.

वाढतां वाढतां केवढा झाला
संस्कृतीचा हा अफाट पसारा !
काही म्हणती, ‘ यांतच नाश
मानवजातीचा
मूळ विसरला मानव आज.
विस्तार मोठा जरि या वृक्षाचा
—वासंतिक धुंदी खेळे पानीं पानीं
फुलांफळांचा बहरहि येई—
सत्त्वशोषक वेलीचें वेटाळें
बुंध्याफांद्यावर.

कोमल लतिका, गोजिरवाणी,
असहाय, दीन वाटली आधी,
तीच झाली आज पोशिंद्याचा काळ.
गुल्जार वेढ्यांत विसरला वृक्ष
धरित्री माता—शांत, खोल, शक्त,
अमित युगांचें जी रहस्य जाणी,
जींतून घेई हा सत्त्वसर्वस्व.
पोकळ संस्कृति, कला–विलास
जीवनास होई असाच घातक.'
असेल यांत थोडेसें तथ्य.
फापट पसारा थोडा का आहे
जीवनीं आमुच्या ?
आणखी ऐकतों,
' जीवन क्षुद्र; कला, साहित्य,
तत्त्वज्ञान किंवा संस्कृति सारी
यांत परिणति, परिपूर्णता
होते जीवनाची.
चिखलांतून ये कमळ निर्मळ
यांतच थोरवी—भारतीयांच्या
संस्कृतीचें हें जुनें प्रतीक—

असंख्य किंवा चुरडावीं फुलें—
अत्तर—थेंब.’
[आजच्या भाषेंत म्हणा बापुडे
कच्च्या मालाचें बाजारी स्वरूप !]
उपमा, दृष्टांत येथवर ठीक !
त्याने का होई तत्त्व—निवाडा ?
जीवन, कला—स्थूलार्थानें किंवा
जीवन, संस्कृति यांचा उगाच
विरोधी संबंध लावितां येई
अशीच आपत्ति.

पाहिलें पाहिजे निराळ्या दृष्टीने
जीवन, कला—नव्हेत हीं दोन !
उच्चनीचत्वाचा संबंधहि नसे.
अनुभूतींचा घेऊन आसरा
मानवी मन जाई पुढारां
जुन्यास देऊन नवी कलाटणी
उभवी आपुली निराळी सृष्टि—
संयमित, शक्त.
हाच नियम जीवनीं आहे.

कला ही काही आगळी नाही
जीवनापरती.
तत्त्वज्ञान्यांनी ज्यास म्हटलें ‘ चांग जीवन ’
अनुभूतींतच आहे सार त्याचें.
म्हणून आम्ही
अनुभूतींतच पाहिलें पाहिजे
जीवनाचें आणि कलेचें रहस्य.
अनुभूति सदा मागे खेंचते;
जीवाची धांव असते पुढे.
परंपरात्मक, क्रांतिकारक
अशा या दोन प्रवृत्तींचा खेळ
चालला दिसे.

अनुभवांतील घेऊन घटना
संबंध त्यांचे जुळवी मन.
कार्य–कारण, औचित्य किंवा
शुद्धानंदाचे लागून नियम
आपोआप त्यांची होतसे चाळणी.
आणिक जणू नांवें घालून
निरनिराळया आंतील कप्प्यांत

जपून ठेवी त्यां आपुलें मन.
एकादे वेळीं नवीन मेळ
जमतां, याच संग्रहाच्या पोटीं
जन्म घे नवीन घटना, कृति,
गोड कल्पना, शोध क्रांतिकारी,
हृद्य, अवद्य कलाकृति वा.
जीवनपथींचीं नवीं क्षितिजें
सामावती इथे साऱ्यांचीं बीजें.

दुर्बिणींत कधी लहानपणीं
फुटक्या काचांची किमया पाहिली
क्षणोक्षणीं नव्या रम्य आकृती;
मधेंच कधी जुळून येई
मोहक दृश्य अतीव सुंदर
क्षणांत वितळे—चमकली वीज
सुप्त जगाचें चित्र दावून—
बालमनाला आनंद होई.
दुर्बिण फिरवी पुन्हा पाहण्या.
परि एकदा गेलें तें गेलें—

दृष्टिपलीकडे.

परंतु आहे जीवनानंद
अधिक शाश्वत.

अनुभूतींचा घेऊन आधार
उभवितों आम्ही नवीन सृष्टि
—नाही पोकळ, स्वप्नांतील वा,
खुरीखुरी ही कांट्याफुलांची—
मात्र अधिक रम्य सुखद.

उत्स्फूर्त जीवन म्हणजेच कृति आशाफलदा.

हळू हळू मग होतसे प्रगति.
नवीं स्थित्यंतरें, नवीन आशा, नवी उमेद....
जीवनाचें आहे हेंच रहस्य.
जीवनांतील घटक, घटना
अनुभवाने आपुल्या करून
मौलिक रहस्य विशद करी कुशल स्पर्शें

तीच कला म्हणूं.
विकसित फूल कितीहि वर्णिलें
परि जोवर अस्फुट भाव मनांत उठती
तयाच्या दर्शनें, स्पर्शाने किंवा
नाहीच केले विशद तोवरी
फोल सायास !
प्रसाद कलेचा तेथेच खरा
जेथे विलसती मनोभावना,
आपुलेपणांत येऊन करिती
विश्व--राणीव.

आणि पाहिलें जर या दृष्टीने
कला ही असें अवस्था एक
जीवनीं आमुच्या.
एकांतून दुजें सृष्टिनियम.
तोच इथेहि दिसून येतो.
जीवनादर्शांच्या सीमांतावरची
ज्योत जणू ही मार्गदर्शिका.
जीवन तियेंच सतेज, सफळ.

आणि मग देखा
निसर्ग सारा माणसाळला.
अफाट विश्व भयद, अगम्य
व्यापून उरला दशांगुळें एक
पुरुषोत्तम.
“ हें विश्वचि माझें घर ” ही द्वाही
दाही दिशांला, मनोमनांत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६४२९
REFBK-0006421
REFBK-0006421
अनुक्रम २५३४५ वि. काव्य
क्रमांक १४५५ नों. दि. २३।३।६०

प्रमुख विक्रेते

**केमकर आणि मंडळी,**

विठ्ठलभाई पटेल रोड,

**मुंबई ४.**

मूल्य

**दीड रुपया**